नि.दि.दा.क्र. ३३३/२०२४
निशाणी क्र.६० पासून पूढे

<u>वादीतर्फेसा.क्र.१ चा उलटतपास प्रतिवादींतर्फे वकील श्री. व्ही. व्ही. उढाण यांच्यामार्फत शपथेवर सूरू.</u>

२. गटक्रमांक २८६ मध्ये मला धरून एकूण सात खातेदार आहेत.

**प्रश्न –** तिर्थराज भांडत असलेल्या जमीनीच्या चतूसिमा तूम्हाला सांगता येतील काय?

**उत्तर** – पूर्वेस – बळीराम दत्तू म्हसके, पश्चिमेस – सूदर्शन वसंत म्हस्के, दक्षिणेस – दादाभाउ रामभाउ जायकर व उत्तरेस – कल्याण भाउसाहेब म्हस्के.

३. हे म्हणणे बरोबर आहे की, मी दि.१४.१०.२०२४ रोजी तहसीलदार यांना अर्ज दिला होता. आता मला दि.१४.१०.२०२४ रोजीच्या अर्जाची छायांकीत प्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे, हा तोच अर्ज आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे त्यास **नि.क्र.७२** देण्यात येत आहे. आता मला नि.क्र.६७ कडील पंचनामा दाखविण्यात आला. हे म्हणणे बरोबर आहे की, दि.१४.१०.२०२४ रोजीच्या अर्जानंतर दि.१६.१०.२०२४ रोजी मी गोंदी पोलीस स्टेशनला एफ. आय. आर. क्र.३१२/२०२४ नोंदविला होता. हे म्हणणे बरोबर आहे की, सदर फिर्याद माझ्या सांगण्याप्रमाणेच पोलीसांनी लिहून घेतली होती. हे म्हणणे बरोबर आहे की, नि.क्र.७२ कडील अर्जात मी असे नमूद केले आहे की, "वरील आठ इसमांनी सात एकर जमीनीवर अचानक येवून अतिक्रमण केले आहे”. मला नि.क्र.६९ वरील एफ.आय. आर. दाखविण्यात आली त्यामध्ये "सदर लोकांनी माझे शेतीगट नंबर २८६ मधील सोयाबीनचे पिक काढलेल्या शेतात रोटा मारून दि.१३.१०.२०२४ रोजी ज्वारीची पेरणी करून अतिक्रमण केले आहे " हा मजकूर बरोबर आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, दि.१४.१०.२०२४ रोजीचा अर्ज आणि दि.१६.१०.२०२४ रोजीचा एफ. आय. आर मध्ये मी सोयाबीन, कापूस आणि तूर या पिकांचा उल्लेख केला आहे.

४. प्रतिवादींनी अतिक्रमण केल्याची बाब प्रस्तूत दावा दाखल करतांना मी माझ्या वकीलांना सांगीतली होती.

५. हे म्हणणे बरोबर आहे की, माझे वडील अस्मानराव दत्तू म्हस्के दि.१०.१०.२०१३ रोजी मयत झाले. हे म्हणणे बरोबर आहे की, माझे वडील व प्रतिवादी यांचे संबंध चांगले होते. मला माहित नाही की, माझ्या वडीलांना सन २००२–२००३ मध्ये पैशांची गरज होती. हे म्हणणे बरोबर नाही की, माझ्या वडीलांना सन २००३ मध्ये रू.२,२५,०००/– घेवून संपूर्ण जमीनीचा ताबा प्रतिवादींना दिला होता. हे म्हणणे बरोबर नाही की, २००३ पासून आम्ही कधीही जमीनीवर गेलो नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, माझ्या वडीलांनी त्यांच्या हयातीत प्रतिवादींविरूध्द कोणताही दावा दाखल केला नव्हता. प्रस्तूत दाव्यात वादग्रस्त जमीनीचा मालकी दाखवणारा दस्त म्हणून सातबारा व्यतिरिक्त इतर कोणतेही कागदपत्रे आम्ही दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे बरोबर नाही की, एफ.आय. आर. दाखल केल्यानंतर तपासीक अधिकारी

यांनी प्रतिवादीच वहिती करतात, असा अहवाल मा. सत्र न्यायालयात दाखल केला. हे म्हणणे बरोबर नाही की, दि.१४.१०.२०२४ रोजी तहसीलदार यांना अर्ज दिल्यानंतर, प्रतिवादींना कूठलीही नोटीस न काढता आम्ही महसूल अधिका–यांशी संगनमत करून खोटा पंचनामा करून घेतला. हे म्हणणे बरोबर नाही की, मी प्रतिवादींविरूध्द चोरीची खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे बरोबर नाही की, प्रतिवादीने दाखल केलेला नियमित दिवाणी दावा क्र.३२९/२०२४ ला शह देण्यासाठी मी प्रस्तूतचा दावा दाखल केला. हे म्हणणे बरोबर नाही की, आज रोजी जमीनीचे भाव वाढल्यामूळे माझी नियम बदलली किंवा सातबारापत्रकी आमची नावे असल्याचा गैरफायदा घेवून मी प्रस्तूतचा खोटा दावा दाखल केला.

६. हे म्हणणे बरोबर नाही की, दि.२७.०३.२०१८ रोजीच्या करारावर मी आणि माझे बंधू हरीभाउ यांनी स्वाक्षरी केली. हे म्हणणे बरोबर नाही की, सन २००३ पासून वादग्रस्त आठ एकर जमीन प्रतिवादींच्या ताब्यात आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, दि.२७.०३.२०१८ च्या करारनाम्याप्रमाणे माझ्या वडीलांनी सन २००३ साली आठ एकर जमीनीचा ताबा प्रतिवादींना दिला होता. हे म्हणणे बरोबर नाही की, मी आज रोजी खोटे शपथपत्राआधारे खोटी साक्ष देत आहे किंवा खोटा दावा दाखल केला आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/–
(एस. एस. जैन)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अंबड

दिनांकः०४/०२/२०२६